ISSN 2349-638X

REVIEWED INTERNATIONAL JOURNAL

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

MONTHLY PUBLISH JOURNAL

VOL-II ISSUE-VIII AUGUST 2015

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- editor@aiirjournal.com
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR:– PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# पंडित विष्णु दिगंबर पलुस्कर यांचे चरीत्र आणि कार्याचा अभ्यास.

**श्री. कांबळे अश्विन पांडुरंग**
समता उच्चमाध्यमिक विद्यालय,
जोडजवळा ता. जि. लातूर.

## प्रस्तावना.

आधुनिक काळात संगीताचा प्रचार व प्रसार महान व्यक्तींमुळे झाला ती व्यक्ती म्हणजे पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर होत. संगीताचे कार्यक्रम सादर करून जनसामान्यांत अभिरूची व जाण निर्माण करणे, सर्वात महत्वाचे संगीत क्षेत्रातील कलावंताला प्रतिष्ठा मिळवुन देणे, संगीताच्या क्रियात्मक बाजुची योग्य मांडणी करून नवीन अभ्यासक्रम तयार करणे, परीक्षा पध्दती निर्माण करणे, स्वत: ची स्वरलीपी तयार करणे, संगीतास शृगाररसाकडुन भक्तीरसाकडे वळविणे अशा अनेक गोष्टी पंडित पलुस्करांनी केल्या.

अशा या संगीताच्या महात्म्याचा जन्म १८ आगस्ट १९७२ रोजी श्रावण महिण्यात कुरूंदवाड येथे झाला. त्यांचे वडील हरिदास होते. मुळ आडनाव गाडगीळ; परंतु पलुस गावाचे राहणारे म्हणुन पलुस्कर या नावाने प्रसिध्दीस आले. बुवांचे वडील कीर्तनकार असल्याने संगीताचा वारसा परंपरेनेच आला. शाळेतही ते एक हुशार विद्यार्थी म्हणुन ओळखले जात. एकदा दत्तजयंतीच्या उत्सवाच्या वेळी दारू उडवीत असताना डोळयास इजा होऊ डोळे अधु झाले. अनेक उपचारांनतरीही डोळे पुर्ववत बरे होऊ शकले नाहीत त्यामूळे डॉक्टरांनी व इतर हितचिंतकांनी संगीत शिक्षणाचा सल्ला दिला.

## १. पंडित विष्णु पलूस्कारांचे कार्य :

आपण जे गातो ते लिपीध्द करण्याचे काम त्यांना महत्वाचे वाटले. म्हणुन स्वत: ची एक स्वरलिपी तयार केली व त्यात सर्व नोटेशन लिहुन ठेकले, ज्यामुळे ही कला पुढच्या पिढीपर्यंत पोचु शकली. गाण्यातील परीक्षापध्दतीही त्यांनीच चालु केली. प्रवेशिका मध्यमा, विशारद, अलंकार इ. परीक्षांचे अभ्यासक्रम तयार केले.

५ मे १९०१ रोजी ‘गांधर्व महाविद्यालयाची’ स्थापना केली. मुंबई, पुणे, नागपुर, येथे त्यांच्या शाखा काढल्या. गांधर्व महाविद्यालयातर्फे परीक्षा घेतल्या जातात. आजही लहानमोठया शहरातुन अनेक शाखा निघुन परीक्षा पध्दतीने अनेक विद्यार्थी गायनाचे शिक्षण घेत आहेत.

१९७८ ते १९२२ या काळात पाच संगीत परिषदांचे आयोजन पलुस्करांनी केले. संगीत प्रचारासाठी श्रीलंका, म्यानमार, नेपाळ इ. ठिकाणी दौरा केला.

पंडित पलुस्कर हे राष्ट्रप्रेमी होते. स्वतंत्र्याच्या आंदोलनात अप्रत्यक्षपणे क्रांतिकारकांना मदत केली. सभेच्या शेवटी 'वंदे मातरम्' म्हणण्याची प्रथा त्यांनीच सुरू केली. ‘रघुपति राघव राजाराम’ यापदाला संगी देऊन रामधुन लोकप्रिय केली. महात्मा गांधींनी भजन आपल्य आश्रमात प्रार्थना म्हणुन सामील करून घेतले.

पंडित पलुस्कर धार्मिक प्रवृतीचे होते. तुलसी रामायणावर भक्तीभावने प्रवचनही करीत असत. आयुष्यास आध्यात्मीक जोढ दिली. या काळात नाशिक येथे ‘श्रीरामनाम आश्रमची स्थापना केली. आयुष्यभर संगीताचा प्रचार करण्यासाठी आयुष्य वाहिलेल्या या पुजाऱ्याने २१ आगस्ट १९३१ रोजी मिरज येथे देह ठेवला पंडित पलुस्करांनी उत्तमोत्तम शिष्य तयार केले, बी. आर. देवघर, बी. एन. कशाळकर, पंडीत ओंकार ठाकुर, विनायकबुवा, पटवर्धन, नारायणराव व्यास, पं. शंकरराव बोडस, शंकरराव सप्रे आदी.

## कार्य :

१. पं. पलुस्कर ग्वाल्हेर घराण्याचे गायक होते. स्थायी दोनदा म्हणणे; बोलताना, लयकारी दाणेदार, ताना या सर्व गोष्टी त्यांच्या गायनात दिसत.

२. ‘जय जगदीश हरे’ ही पारंपरीक प्रार्थना पंडित पलुस्करांच्या पुण्यस्मरण सोहळयाच्या वेळी म्हणाली जाते.

३. पंडितजी एक उत्तम वाग्गेयकार होते. संतांच्या अनेक रचनांना त्यांनी मधुर चाली दिल्या.

४. शृंगाररप्रधान चिजा बदलुन भक्तीरसयुक्त चाली बांधल्या.

५. संगीत बालप्रकाश, संगीत बालबोधप, अमृत लहरी, व्यायाम संगीत, रागप्रवेश, संगीत–शिक्षक, महिला संगीत अशी सुमारे ५० पुस्तके लिहिली.

६. संगीत प्रसारासाठी १९०५ मध्ये ‘ संगीत अमृत प्रवाह मासिक सरू केले’.

७. पारंपारीक गुरूकुल व आधुनिक सामुहिक शिक्षण पध्दतीचा उत्कृष्ट समन्वय साधला.

८. स्गीत शिक्षणाद्वारे “तानसेन जरी निर्माण झाले नाही. तरीही ‘कानसेन’ मात्र तयार झाले पाहिजेत” हा व्यापक दृष्टीकोन त्यांनी ठेवला.

९. संगीत कलाकारास प्रतिष्ठा मिळवुण देणे हे आयुष्याचे ध्येय मानले.

१०.स्वत: ची स्वरलिपी निर्माण करून पुढील पिढीसाठी ही कला जिवंत ठेविली.

## सदर्भ :

१. देशपांडे वामन हरी – अभीजीत

२. ओ. गोस्वामी – द हिस्टरी ऑफ इंडियन म्युझीक.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com